• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३२० • बुधवार,दि.२१ फेब्रुवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये

• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 320 • Wednesday 21 Feb 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3



।। श्री गंगाभारती कृपा ।। आपल्या आवडीचा बेड आपल्या बजेटमध्ये 7038389999 ऑफर 10000 खरेदीवर १५% डिस्काऊंट आदित्य फर्निचर मॉल आजच बुक करा... आपल्या स्वप्नातील बेड... सोमेश्वर मंदिरासमोर,बार्शी रोड,बीड



दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज |बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर |जालना |लातूर |धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

▪ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ▪



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !! दहिवाळ सुवर्णकार * नविन पत्ता * दहिवाळ सुवर्णकार आशापुरा कॉम्प्लेक्स,डी.पी.रोड, सारडा नगरी जवळ, बीड. फोन.02442-230377, 8432771777



बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955


# महायुतीत लोकसभेच्या भाजपला सर्वाधिक जागा ३२



**मुंबई । वृत्तसेवा**

**भाजपच्या राष्ट्रीय अधिवेशनानंतर महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाच्या चर्चेला वेग आला आहे. महाविकास आघाडीत जवळपास ४० जागांवर एकमत झाल्याची माहिती आहे. फक्त ८ जागांवरुन तिढा कायम आहे. तर दुसरीकडे आता महायुतीमधील घटकपक्षांची जागावाटपाची चर्चाही अंतिम टप्प्यात आल्याची माहिती आहे. भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यात लोकसभेचे जागावाटप २०२४) कसे होणार, याची उत्सुकता राजकीय वर्तुळाला लागून राहिली होती. महायुतीच्या नेत्यांनी चर्चा केल्यानंतर आता लोकसभा जागावाटपाचा संभाव्य फॉर्म्युला समोर आला आहे.**

सूत्रांच्या माहितीनुसार, महायुतीमध्ये लोकसभेला ३२-१२-४ या सूत्रानुसार जागावाटप होण्याची शक्यता आहे. यामध्ये भाजपच्या वाटयाला सर्वाधिक ३२ जागा येतील. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वाट्याला १२ जागा येतील. तर अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला अवघ्या ४ जागांवर समाधान मानावे लागू शकते. त्यामुळे अजित पवार नाराज होण्याची शक्यता आहे. परंतु, लोकसभेला भाजपला अधिक जागा मिळाल्या तरी विधानसभेला शिंदे गट आणि अजित पवार गटाला चांगला वाटा मिळू शकतो. परंतु, त्यासाठी शिंदे गट आणि अजितदादा गट राजी होणार का, हे पाहावे लागेल. सध्या महायुतीच्या राज्यातील नेत्यांमध्ये जागावाटपाची चर्चा सुरु आहे. परंतु, अंतिम निर्णय हा दिल्लीतून होईल, असे सांगितले जात आहे. यामध्ये अमित शाह महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

उद्धव ठाकरे यांच्याविरोधात बंड केल्यानंतर शिवसेनेचे एकूण १३ खासदार एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेले होते. मात्र, सध्याच्या फॉर्म्युलानुसार लोकसभेला शिंदे गटाच्या वाट्याला फक्त १२ जागाच येण्याची शक्यता आहे. त्यामुळे एका खासदाराचा पत्ता कट होईल. हा खासदार कोण असणार, हे आता ठरवावे लागेल. शिंदे गटाने यापूर्वी लोकसभेच्या १८ जागांची मागणी केली होती. परंतु, भाजप महाशक्ती असल्याने त्यांना फक्त १२ जागांवरच समाधान मानावे लागू शकते. तर अजित पवार गटाकडे सध्या राष्ट्रवादीचे तीन खासदार आहेत. तरीही त्यांच्या वाट्याला लोकसभेच्या चार जागा येतील. परंतु, मंत्रीपदापासून ते निधीवाटपात कायम स्वत:च्या गटाचा वरचष्मा ठेवणारे अजित पवार लोकसभेच्या फक्त ४ जागा घेण्यासाठी राजी होतील का, हा प्रश्नच आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्येही जागावाटपाची चर्चा सुरु आहे. ही चर्चा आता जवळपास अंतिम टप्प्यात आली आहे. मविआच्या नेत्यांमध्ये ४० जागांवर एकमत झाल्याची माहिती आहे. अशातच उद्धव ठाकरे यांच्याकडून १८ लोकसभा मतदारसंघांमध्ये समन्वयकांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे ठाकरे गट लोकसभेच्या या १८ जागा लढवणार असल्याचे स्पष्ट झाल्याचे बोलले जाते.

# मुंबई महापालिकेत परिवर्तन करून दाखवू -देवेंद्र फडणवीस

**मुंबई । वृत्तसेवा**

श्रमिकांनी श्रम करून बनवलेली ही मुंबई आहे. दहा-वीस टक्के लोक चकचकीत इमारतीत राहतात त्यांचीही मुंबई नाही. बीएमसीमध्ये काही लोकांनी राज्य केलं. त्यांनी फक्त आश्वासन दिली आणि वर्षानुवर्ष तीच आश्वासन द्यायची. निवडणुका संपल्या की त्यांना विसरून जायचं. २५ २५ वर्ष हे बघितलं. पण मागील दीड वर्षात आम्हाला संधी मिळाली आणि आम्ही जेवढे करता येईल तेवढं केलं. रक्ता माणसाची माणसं ही आमच्यासाठी महत्त्वाचे आहेत. एफएसआय आणि टीडीआर चे व्यवहार करणारे आमच्यासाठी महत्त्वाचे नाहीत. आम्ही मुंबईतील मराठी माणसाला मुंबईतून हद्दपार होऊ देणार नाही, असे



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुंबईत धन्यवाद देवेंद्रजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबईतील मराठी माणूस स्वत:च घर का मिळवू शकत नाही. कोणत्या अडचणी येतात हे पाहून आपण शासन निर्णय घेतले. मात्र, २०१९ मध्ये आपलं सरकार गेलं. ज्यांनी वारंवार आम्ही मराठी माणसासाठी आहोत. मराठी माणसासाठी लढतो, अशा प्रकारच्या वल्गना केल्या त्यांच राज्य आल्यानंतर २०१९ चा हा शासन निर्णय त्यांनी गुंडाळून बाजूला ठेवला. त्यांनी बिल्डर धार्जिणे धोरण त्यांनी महाराष्ट्रात आणले. सामान्य मराठी माणसाचे स्वप्न त्यांनी गुंडाळून ठेवले. देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले, आपल्या आशीर्वादाने शिंदे साहेबांच्या नेतृत्वात आपण पुन्हा काम सुरु केले. मुंबई, ठाण्यातील गृहनिर्माणाची परिषद दरेकर यांनी घेतली. बिल्डरांच्या जाळ्यातील सामन्यांना घर घेऊन देण्यासाठी काय करता येईल, यासाठी १६ मागण्या माझ्यासमोर ठेवण्यात आल्या. त्या सोळा मागण्या मी पूर्ण केल्या. जीआर काढला. शासन निर्णय काढला आणि अंमलबजावणी देखील सुरु केली. ती अंमलबजावणी झाल्याबद्दल धन्यवाद देवेंद्रजी हा कार्यक्रम घेतलाय, असेही फडणवीस यांनी नमूद केले.

फडणवीस म्हणाले, पुढील दहा वर्षांनी माझ्यासमोर बसलेला प्रत्येक माणसाला हक्काचा घर हे त्याचा असेल, अशा करिता मुंबईकरता तुमचा आशीर्वाद घ्यायला आलोय. तुमच्या आशीर्वादाची ताकद ही इतकी जबरदस्त आहे की हे परिवर्तन आम्ही करून दाखवू. अभयदय नगरचा सीएनडीचा विकास हा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे इथे येण्याआधी मी मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. ती फाईल आपण संपूर्ण पूर्ण केली आहे सर्व काम केलं आहे.



**बीड - विश्व वंदनीय छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत शिव एकात्मता ज्योत काढण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिराळे नगर, जिजाऊ नगर, तिरुपती नगर, माळे गल्ली, शिराळे गल्ली आधी ठिकाणी शिवजयंती निमित्त उपस्थित राहून छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीमध्ये नवनाथ अण्णा शिराळे यांनी सहभाग नोंदवून शिवभक्तांना संबोधित केले. यावेळी दत्ताभाऊ शिगळे, माजी नगरसेवक बाबुराव परळकर यांच्यासह शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# मराठा समाजाचा संघर्ष आता संपलाय

**मुंबई । वृत्तसेवा**

मराठा आरक्षणाच्या विधेयकाचा मुसदा विधानसभा आणि विधान परिषदेत एकमताने मंजूर करण्यात आला. हे आरक्षण टिकणारे मजबूत असे आरक्षण आहे. मराठा समाजाचा संघर्ष आता संपला असल्याची प्रतिक्रिया नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी दिली आहे. दादा भूसे म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आज मराठा समाजाला १० टक्के नोकरी आणि शिक्षणात आरक्षण देण्याचे विधेयक मंजूर झाल्याने आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री महोदयांनी आपली शपथ पूर्ण केली आहे. जवळपास अडीच कोटी पेक्षा जास्त घरांमध्ये जावून सर्वेक्षण करण्यात आले. यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी जी मेहनत घेतली त्यांचे






सर्वांचे अभिनंदन करतो आणि धन्यवाद देतो. आयोगाने दिलेल्या अहवालातील शिफारशी राज्य मंत्रिमंडळाने स्वीकारल्या आहेत. हे सर्व करत असताना कुठल्याही समाजाला धक्का न लावता हे स्वतंत्र आरक्षण दिले आहे. यामुळे समाजात तेढ होणार नाही यासाठी आपल्या सरकारने सर्व बाबींचा विचार करून टिकणारे आरक्षण दिले आहे. हे आरक्षण टिकणारे मजबूत असे आरक्षण आहे. मराठा समाजाचा संघर्ष आता संपला असल्याची प्रतिक्रिया दादा भुसे यांनी दिली आहे. सभागृहात सर्व पक्षांनी एक मताने मराठा आरक्षण ठराव मंजूर केला. मला खात्री आहे ज्या पद्धतीने अभ्यास करून हे विधेयक मांडले गेले, हे विधेयक टिकेल अशी मला आशा वाटते. मुख्यमंत्र्यांना मी धन्यवाद देतो. मराठा समाजाने खूप लढा दिला आहे. मराठा समाजातील अनेकांना बलिदान द्यावे लागले. आंदोलकांची जी डोकी फोडली गेली, ते न करता देखील आरक्षण देता येईल. टिकणारे आरक्षण मिळेल अशी आशा बाळगतो.

# सरकारकडून तातडीने मराठा समाजाला नोकऱ्या कुठे मिळतील- ठाकरे

**मुंबई । वृत्तसेवा**

२०१८ ला काय झालं यावर मला बोलायचं नाही. मुख्यमंत्र्यांनी आरक्षण दिल्याबद्दल धन्यवाद. टिकणारं आरक्षण मराठा समाजाला मिळेल, अशी आशा आहे.



अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली. ते माध्यमांशी मराठा आरक्षणावर बोलत होते. ठाकरे म्हणाले, आरक्षणाचा विषय शांततेत सोडवता आला असता. तातडीने मराठा समाजाला नोकऱ्या कुठे मिळतील, हे सरकारने जाहीर करावे. मुख्यमंत्री कसे आहेत, काय आहेत, त्यांचा इतिहास काय आहे, हे सर्वजण जाणता. सरकारने निवडणुकीच्या तोंडावर हमी दिली आहे. कायद्याच्या पातळीवर आरक्षण टीकेल अशी अपेक्षा आहे. आज मला राजकारणावर बोलायचं नाही. पूर्ण खात्री पटल्याशिवाय या सरकारवर विश्वास ठेवता येणार नाही. आरक्षणाबाबत कोणतेही दोन मते नाहीत. वेळासोबत वृत्तीही महत्त्वाची आहे.

# सरकारने आरक्षणात दुरुस्ती करावी -जरांगे पाटील

**वडीगोद्री । वृत्तसेवा**

विधानसभेत मराठा आरक्षण एकमताने मंजूर झाले याचे स्वागतच आहे. पण ही आमची मागणी नव्हती. आम्ही ओबीसीतून आमचे हक्काचे कुणबी आरक्षण मिळविणारच, असा निर्धार मनोज जरांगे-पाटील यांनी आज (दि.२०) केला. मराठा आरक्षणासाठीच्या आंदोलनाची पुढील दिशा उद्या जाहीर करु, ओबीसी आरक्षणातच आमचं हक्काचं आरक्षण आहे. त्यावर आम्ही ठाम आहोत, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. दरम्यान जरांगे



यांनी सलाईन काढले असून, उपचार घेणे बंद केले आहे. विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनात राज्य सरकारने मराठा आरक्षणाचे विधेयक एकमताने मंजूर केले. त्यानंतर जरांगे पत्रकार परिषदेत बोलत होते. आज त्यांनी सगे-सोयरे बाबतीत निर्णय घ्यायला हवा होता. ज्यासाठी मराठा समाज आक्रोश करतोय, त्यांची तुम्ही चेष्टा करत आहात. ही आमची आडमुठी भूमिका नाही. ही भूमिका आडमुठी असती तर ६ महिने वेळ दिला नसता. उद्या आमच्या आंदोलणाची दिशा ठरल्यावर यांना मराठ्यांची गरज समजेल. निवडणुकीच्या दृष्टीने तुम्ही तुमच्या भविष्याचे पाहिले, आमच्या लेकरांच्या भविष्याचे आम्ही बघू , असा इशारा त्यांनी सरकारला दिला.उद्या आंदोलनाची दिशा ठरवली की, सगळे उघड होईल. आम्ही उद्या बैठक घेऊन पुढील आंदोलनाची दिशा ठरवणार आहे. अन्न आणि पाण्याविना उद्यापासून आंदोलनाची दिशा ठरवणार आहे. महाराष्ट्रातील सगळ्यांनी या बैठकीला यावे. सगेसोयरे अध्यादेशावर ६ लाख हरकती आल्या त्याची वर्गवारी सुरू आहे. त्याला


पुढील पानावर



asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे वॉटर कलर,सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. वाघीरे 9146702323 8149800020
पत्ता : राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड,बीड


# मराठा आरक्षण विधेयक मंजूर -मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई । वृत्तसेवा**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षण विधेयक आज विधीमंडळाच्या पटलावर ठेवलं. मुख्यमंत्र्यांनी मांडलेलं मराठा आरक्षण विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर झालं. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या आरक्षण विधेयकाला आमचा कुणाचाही विरोध नाही, त्यामुळे याला बहुमत म्हणा किंवा एकमत म्हणा, असं विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मराठा आरक्षण विधेयक हे बहुमताऐवजी एकमताने मंजूर होत आहे, असं जाहीर केलं. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता, मराठा समाजाला कायद्यात टिकणारं आरक्षण आम्ही देत आहोत, असं मुख्यमंत्री म्हणाले. राज्य सरकारने आज मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलावलं. यामध्ये मागासवर्ग आयोगाने केलेल्या सर्वेक्षणानंतर सादर केलेला अहवाल राज्य सरकारने स्वीकारला. त्याला मंत्रिमंडळ मंजुरी मिळाल्यानंतर राज्य सरकारने मराठा



आरक्षण विधेयक विधीमंडळात मांडलं. मराठा समाजाचं आरक्षण कोर्टात टिकणारच. राज्य सरकारने घेतलेला निर्णय मोठा आणि धाडसी निर्णय आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. विरोधी पक्षनेते यांनी मला याबाबतीत मला मुद्दे आणि पत्र दिले आहे. ऋत्यामुळे या संदर्भात मी स्पष्टीकरण देत आहे. ऋकालच शिवाजी महाराज यांची जयंती आपण साजरी केली. ऋशिवाजी महाराज यांच्यापुढे नतमस्तक होऊन आरक्षण देण्याची शपथ घेतली होती. ऋहे सर्व महाराष्ट्राने पाहिलं आहे. ऋमला मराठा समाजाच्या वेदनांची माहिती आहे. मी राज्याचा मुख्यमंत्री आहे, त्यामुळे एका जाती धर्माचा विचार करता येणार नाही. त्यामुळे इतर समजासाठी ही तीच भावना आहे. ऋसब का साथ सबका विकास हे ब्रीद वाक्य मोदी साहेब यांनी दिलं आहे. ऋएकाची बाजू घेण्याच माझ्याकडून होणार नाही. ऋकोणतयाही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची जबाबदारी आहे.

संपादकीय

## गरज व्यापार नियम बदलाची

गेल्या दोन दशकांत जागतिकीकरणाच्या विचारांचा बोलबाला होत आहे; पण आता चित्र बदलत आहे. राष्ट्रीय सरकारकडून देण्यात येणार्या अंशदान आणि प्रोत्साहनाची सवलत मागे घेण्याची व्यवस्था असलेल्या व्यापक योजनेचे समर्थक मुक्त व्यापार विचारांपासून पाठ फिरवत आहेत. प्रश्न असा की, हवामान बदलाच्या जोखमीसह युद्धग्रस्त जगात नवीन जागतिक नियम कोणत्या रूपात आकारात येतील? नव्या वर्षात जागतिकीकरणासाठी व्यापारी नियमात बदल करावा लागणार आहे. कारण, हे बदल विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांसाठी आणि हवामान बदलाचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक आहेत. फार वर्षांपूर्वी जेव्हा संभाव्य हवामान बदलाबाबत चर्चा सुरू झाली, तेव्हा नव्या व्यापारी करारासाठी चर्चा होऊ लागली. १९९२ मध्ये रिओ शिखर संमेलनामध्ये संयुक्त राष्ट्र हवामान बदल परिषदेसंदर्भाबाबत (कॉप) करार झाला. त्याच काळात जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यूटीओ) अस्तित्वात आली आणि विविध देशांदरम्यान मुक्त व्यापाराला चालना देण्यासाठी जागतिक नियमही काळानुरूप आणण्यात आले. कमी श्रमशक्तीत आणि पर्यावरणपूरक निकषांनुसार एखाद्या वस्तूची निर्मिती केली जात असेल, तर तेथे उत्पादनाचा खर्च हा आपोआपच कमी राहील. त्यामुळे विकसनशील देशांची निर्यातक्षम अर्थव्यवस्था समृद्ध होईलच, तसेच विकसित देशांनाही फायदा होईल. कारण, तेथेही ग्राहकांना कमी किमतीत वस्तू मिळेल अणि सेवेत वाढ होईल. कालांतराने चीनचा समावेश झाल्याने २००१ मध्ये जागतिक व्यापारात व्यापक बदल झाला. चीनकडे विपुल प्रमाणात श्रमशक्ती आहे. तेथे कोणतीही कामगार संघटना नाही आणि पर्यावरण निकष पाळण्याबाबतही गांभीर्य नाही किंवा कडकपणा नाही. तसेच एक शक्तिशाली, स्वतंत्रपणे निर्णय घेणारे सरकार अस्तित्वात होते. जागतिक व्यापार संघटनेत समावेश झाल्यानंतर १९९० मध्ये जागतिक कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनात चीनचा वाटा पाच टक्क्यांवरून तो २०१९ मध्ये २१ टक्क्यांवर गेला. व्यापार वाढला; मात्र जागतिक समृद्धीचा काळ अजून आलेला नव्हता. व्यापारवाढीचा अर्थ म्हणजे कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनामध्ये वाढ होणे, असा होता. गेल्या दोन दशकांत जागतिकीकरणाच्या विचारांचा बोलबाला होत आहे; पण आता चित्र बदलत आहे. राष्ट्रीय सरकारकडून देण्यात येणार्या अंशदान आणि प्रोत्साहनाची सवलत मागे घेण्याची व्यवस्था असलेल्या व्यापक योजनेचे समर्थक मुक्त व्यापार विचारांपासून पाठ फिरवत आहेत. प्रश्न असा की, हवामान बदलाच्या जोखमीसह युद्धग्रस्त जगात नवीन जागतिक नियम कोणत्या रूपात आकारात येतील? सध्याचा सर्वाधिक तापलेला मुद्दा म्हणजे चीनबाबत अमेरिकेची असणारी भूमिका. याकडे निरंकुश आणि हुकूमशाही सत्ताधार्यांविरुद्धची लढाई म्हणून पाहिले जात आहे. मात्र, प्रत्यक्षात हा मुद्दा भविष्यासाठी आवश्यक स्रोत आणि तंत्रज्ञानावर असणार्या नियंत्रणाचा आहे आणि अर्थातच ही बाब खरी आहे. यात हरित अर्थव्यवस्थेचाही समावेश आहे आणि सध्या त्याचीच जगाला गरज आहे. आपण स्थानिक सौरऊर्जा उद्योगाची क्षमता वाढविण्यासाठी अधिकाधिक गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. हेदेखील योग्य आहे. केंद्र सरकारने सोलर सेल आणि मॉडेल निर्मात्यांना आर्थिक साहाय्य करण्याची घोषणा केली आहे. त्याचबरोबर चीनच्या उत्पादनावर प्रचंड आयात कर लावला आहे. त्यामुळे या निर्णयामुळे भारताच्या महत्त्वाकांक्षी शाश्वत ऊर्जा कार्यक्रमावर परिणाम होईल की नाही, हे आताच सांगता येणार नाही. कारण, देशांतर्गत पातळीवरचे उत्पादक स्थानिक मागण्या पूर्ण करण्यास सक्षम नसतील आणि खर्चाच्या पातळीवर तगही धरू शकणार नाहीत. दुसरीकडे, स्थानिक उद्योग उभारणीचे फायदे आहेत. जागतिक मुक्त व्यापार बंद झाल्याने भारतीय उद्योगाच्या निर्यातीसमोर आव्हाने उभी राहू शकतात. एकुणातच सध्या एक नवीन खेळ खेळला जात आहे. त्यामुळे यंदाचे व्यापाराचे नियम पृथ्वी आणि पृथ्वीवर राहणार्या लोकांसाठी फायदेशीर ठरणार आहेत की, त्यांचे नुकसान करतील, हे पाहणे गरजेचे आहे.

### जाहिर प्रगटन

मा.श्रीमती के.सी.बागल, ८ वे दिवाणी न्यायाधीश
क.स्तर,बीड, ता.जि.बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २७१/२०२४
बाजीराव व इतर वि.निरंक

ज्यापेक्षा **मधुकर नानाभाऊ कदम**, रा.नेकनूर, ता.जि.बीड हे दिनांक २८/०२/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. **आणि तसेच अर्जदार :- १) बाजीराव मधुकर कदम, रा. नेकनूर, ता.जि.बीड, २) अर्चना सुधिर वरबडे (भुमकर), रा.सदर.**

अर्जदार क्र. १ **मधुकर नानाभाऊ कदम** यांचा मुलगा असून, अर्जदार क्र. २ ही मयताची विवाहित मुलगी आहे. तसेच मयताची पत्नी **संजीवनी मधुकर कदम** ह्या दिनांक १८/०८/२०२० रोजी मयत झालेल्या आहेत. मयताचे आई-वडील यापुवीर्च मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर मुदतीत कोणीही हरकत न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदाराच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत **मधुकर नानाभाऊ कदम** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**पुढील तारीख १५/०३/२०२४**

**आज दिनांक ०९ फेब्रुवारी २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

क.लिपीक
मार्फत
ॲड.जाधव

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड.

### टी.सी.हरवला आहे

राठोड रविंद्र हेमा या नावाचा टि सी मिठुलाल शारडा पॅलीटेकनील कॉलेज बीड गेवराई ते बीड प्रवास करताना हरवला आहे.सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.७६२०३१२०३२

# आंबेडकरवादी कोणत्याही दबावापुढे झुकत नाहीत

**मुंबई । वृत्तसेवा**

वेगवेगळ्या सरकारांनी वेळोवेळी अभिव्यक्ती स्वातंत्र्य दाबण्याचा आणि त्यावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला. पण, आंबेडकरवादी कोणत्याही दबावापुढे झुकत नाहीत, हे ते विसरले आहेत; ह्या गोष्टी आम्ही सर्वोत्तम बाबासाहेब यांच्याकडून शिकलो असल्याची प्रतिक्रिया एक्स समाज माध्यमातून वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी दिली आहे. हंसराजमीना आणि ट्रायबल आर्मी यांच्या एक्स हँडलवर अनिश्चित काळासाठी बंदी घालण्यात आली यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली. त्यात हा काळा दिवस असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. भ्याड भाजप-आरएसएस सरकारच्या निर्देशानुसार हंसराजमीना आणि ट्रायबल आर्मीच्या द हँडलवर अनिश्चित काळासाठी बंदी घालण्यात आली आहे. दलित आणि आदिवासींचा आवाज दाबण्याची ही पहिलीच वेळ नाही. समाजातील दलित, आदिवासी आणि मुस्लीम या वंचित आणि उपेक्षित घटकांकडून जेव्हा आवाज उठवल्या जातो, तेव्हा सरकारकडून अशी बाजू मांडणाऱ्यांच्या आवाजांना दाबण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. हंसराजमीना आणि अशा प्रत्येक असहमत असलेल्या उपेक्षित आवाजामागे एकजुटीने उभे राहू असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## महाराष्ट्रातून ६ जणांची राज्यसभेवर बिनविरोध निवड

**नागपूर । वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील ६ जणांची राज्यसभा खासदार म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. आज अर्थात मंगळवारी दुपारी ३ वाजेपर्यंत या ६ जागांवर नामांकन मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. मात्र या कालावधीत ना कुठले नवे नामांकन आले ना कुणी आपले नाव मागे घेतले. यामुळे ६ खासदारांची नावे राज्यसभेसाठी बिनविरोध पक्की झाली आहेत. यात भारतीय जनता पक्षाच्यात तीन, तर शिवसेना, एनसीपी आणि काँग्रेसच्या प्रत्येकी एक-एक नेत्याचा समावेश आहे. भाजपकडून अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी आणि डॉ अजीत गोपछडे, शिवसेनेकडून मिलिंद देवरा, एनसीपीकडून प्रफुल पटेल तर काँग्रेसकडून चंद्रकांत हंडोरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांची राजस्थानातून राज्यसभेसाठी बिनविरोध निवड झाली आहे. याशिवाय, भाजपचे चुन्नीलाल गरासिया आणि मदन राठोड यांचीही राज्यसभेसाठी बिनविरोध निवड झाली आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेने विधानसभा सचिव महावीर प्रसाद शर्मा यांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, मंगळवारी नामांकन मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. कुठलेही नवे नामांकन आले नाही. यामुळे हे तीनही नेत्यांची राज्यसभेसाटी बिनविरोध निवड झाली आहे. महत्वाची म्हणजे, उच्च सभागृहात बसण्याची सोनिया गांधी यांची पहिलीच वेळ असणार आहे.

## मराठा समाज मागास असल्याचे सरकारने सिद्ध करावे -संभाजीराजे

**मुंबई । वृत्तसेवा**

मराठा समाजाला शिक्षण आणि शासकीय, निमशासकीय सेवांमध्ये १० टक्के आरक्षण देणारे विधेयक आज (दि. २०) विधानसभेपाठोपाठ, विधानपरिषदेतही एकमताने मंजूर झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात हे विधेयक मांडले. या निर्णयावर माजी खासदार आणि स्वराज्य पक्षाचे संस्थापक संभाजीराजे छत्रपती यांनी एक्स पोस्ट करत प्रतिक्रिया दिली आहे. संभाजीराजे छत्रपती यांनी म्हटले आहे की, मराठा समाजाला टिकणारे आरक्षण मिळावे, यासाठी आधी मराठा समाज मागास असल्याचे सिद्ध करणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने राज्य मागासवर्ग आयोग गठित करून मराठा समाज मागास असल्याचे सिद्ध करावे, ही मागणी घेऊन मी गेल्या दोन वर्षांपासून पाठपुरावा करत होतो. शासनाने मराठा समाजाच्या मागासलेपणाचे सर्वेक्षण करून मराठा समाजास आरक्षण लागू केले, याबद्दल मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व राज्य सरकारचे विशेष आभार व कौतुक ! अपवादात्मक परिस्थिती सिद्ध करून हे आरक्षण न्यायालयात टिकविण्याची जबाबदारी देखील शासनाने कटाक्षाने पार पाडावी, अशी मागणी देखील संभाजीराजे यांनी राज्य सरकारकडे केली आहे. मराठा समाजाला टिकणारे आरक्षण मिळावे, यासाठी आधी मराठा समाज मागास असल्याचे सिद्ध करणे गरजेचे आहे,

## परिक्षा केंद्रावर अडवणूक करणाऱ्या शाळांवर कारवाई होणार



**पुणे । वृत्तसेवा**

शैक्षणिक शुल्क अथवा इतर कोणत्याही कारणामुळे दहावी तसेच बारावी परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांचे हॉलतिकीट न देणे गंभीर बाब आहे. याप्रकारे शाळांनी विद्यार्थ्यांची अडवणूक करू नये. विद्यार्थी, पालकांची तक्रार आल्यास संबंधित शाळांवर परीक्षा झाल्यानंतर कारवाई करण्यात येईल, असा इशारा राज्य मंडळाचे अध्यक्ष यांनी दिला. तसेच आतापर्यंत आशा स्वरूपाच्या दोन तक्रारी प्राप्त झाल्याची माहितीही त्यांनी दिली. गोसावी म्हणाले, तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित शाळांवर आपण कारवाई करीत असतो. संबंधित प्राथमिक शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक आणि संचालक यांना या संदर्भात सूचना दिल्या आहेत. परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना हॉलतिकीट न देणे अत्यंत गंभीर आहे. राज्य मंडळ कोणत्याही कारणामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता गांभीर्याने घेत असते. आतापर्यंत आमच्याकडे दोन तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. दरवर्षी सरासरी दोन ते तीन तक्रारी येत असतात. त्यामध्ये प्रामुख्याने इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडून हे प्रकार घडल्याचे दिसून आले आहे. परीक्षेदरम्यान गतवर्षी जे गैरप्रकार झाले, त्याबाबत ११ गुन्हे दाखल झाले असून, संबंधितांवर कायदेशीर कारवाई सुरू आहे. परीक्षा केंद्राच्या शंभर मीटर परिघात १४४ कलम लागू असते. केंद्राजवळ झेरॉक्स सेंटरही बंद केली जातात. परीक्षेदरम्यान मूळ विद्यार्थी तसेच डमी बसलेल्या विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल केला जातो तसेच मूळ विद्यार्थ्यांस पुढील पाच परीक्षेला बसू दिले जात नाही. गतवर्षी सुरुवातीचे काही दिवस शिक्षकांचा संप सुरू होता, तरीही आम्ही बारावीचा निकाल वेळेवर जाहीर केला होता. यंदाही मे च्या शेवटच्या आठवड्यापर्यंत बारावीचा निकाल लावण्यावर आमचा भर आहे, असेही यांनी सांगितले.

## मराठा समाजाची राज्य सरकारकडून फसवणूक

**मुंबई । वृत्तसेवा**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी सरकारने विशेष अधिवेशन बोलावले. विशेष अधिवेशनात मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष अधिवेशनात मराठा आरक्षण विधेयक एकमताने मंजूर करण्यात आले. राज्य सरकारने मराठा समाजाला नोकरी आणि शिक्षणात १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस नेत्यांनी या विधेयकावरून राज्य सरकारवर टीका केली आहे. मराठा समाजाला आरक्षण दिले पाहिजे, ही सर्व राजकीय पक्षांची भूमिका आहे. परंतु हे आरक्षण न्यायालयात टिकले पाहिजे हे सर्वांत महत्वाचे आहे. आरक्षणासाठी सरकारने विशेष अधिवेशन बोलावले. पण या विधेयकावर सरकारने चर्चा केली नाही. केवळ एकपात्री प्रयोग सादर केला आणि मराठा समाजाला शैक्षणिक व नोकरीत १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घाईघाईत घेतला असून हे आरक्षण न्यायालयात टिकेल का? असा प्रश्न महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले



यांनी उपस्थित केला. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी आंदोलन सुरु केले आहे. आजही ते उपोषण करत आहेत. जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य केल्या असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते. गुलालही उधळला मग जरांगे पाटील यांना उपोषण का करावे लागत आहे. मुख्यमंत्र्यांनी जरांगे पाटील यांना काय शब्द दिला होता ते जनतेसमोर स्पष्ट करावे. मागासवर्गीय आयोगाच्या अहवालानुसार मराठा समाजाचे मागसेलपण सिद्ध केले आहे, असा सरकारचा दावा आहे, मूळात या सर्व्हेवर अनेक शंका उपस्थित झालेल्या आहेत. सहा दिवसात मुंबई शहरातच २६ लाख लोकांचा सर्व्हे केला हे आश्चर्यकारक आहे, असे नाना पटोले यांनी म्हटले आहे. दरम्यान, काँग्रेस आघाडी सरकारने २०१४ साली मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण दिले होते परंतु ते देवेंद्र फडणवीस सरकारला न्यायालयात टिकवता आले नाही. फडणवीस सरकारने २०१८ साली अधिवेशन बोलावून एकमताने १२ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला पण हे आरक्षण सुप्रीम कोर्टात टिकले नाही. आता पुन्हा मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय विधिमंडळात एकमताने पारित करण्यात आलेला आहे. भाजपा सरकारने आज घेतलेला निर्णय न्यायालयात टिकेल का? हाच महत्वाचा प्रश्न आहे, असे नाना पटोले म्हणाले.

## गरजू रुग्णांच्या शस्त्रक्रियेसाठी दिली मदत

**जालना। प्रतिनिधी**

प्रांत ३२३४ एच - २ च्या अन्नछत्र प्रकल्पाचे अध्यक्ष लॉ. रामकुंवर अग्रवाल यांनी आपल्या लग्नाचा वाढदिवस विविध



सेवा कार्याद्वारे साजरा केला. परतूर येथील लॉयन दृष्टी नेत्रालयात गरजू रुग्णांच्या शस्त्रक्रियेसाठी ११ हजार रुपयाची देणगी रुग्णालयाचे विश्वस्त तथा माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया, अतुल लड्डा, श्यामसुंदर लोया व सुनील बियानी यांच्याकडे सुपूर्द केला. तसेच अंबड तालुक्यातील धाकलगाव येथील मनोरुग्ण आश्रमासाठी एक महिन्याचा किराणा देण्यात येऊन जिल्हा महिला व बाल रुग्णालयात गरजूंना मिष्ठांन्न भोजन देण्यात आले. याप्रसंगी परिवारातील सौ. पुष्पादेवी अग्रवाल, कश्मीरीलाल अग्रवाल, सौ. निशा पंकज अग्रवाल, सौ नयना दिनेश अग्रवाल यांची उपस्थिती होती. उपस्थितांनी रामकुंवर अग्रवाल व सौ पुष्पादेवी अग्रवाल यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. यावेळी लॉयन्स गोल्ड परिवाराचे माजी प्रांतपाल विजयकुमार बगडिया, विजय दाड, रिजन चेअरपर्सन सौ. मीनाक्षी दाड, मुरारीलाल गुप्ता, रामदेव श्रोत्रीय, शरद जयस्वाल, कमलकिशोर गोयल, अशोक मिश्रा, रमेशचंद्र अग्रवाल, सुभाषचंद गादिया, लछमण पोपट, भाषिक अल्पसंख्यांक संघटनेचे अध्यक्ष ओमप्रकाश धानावाला, सुखदेव बजाज, बाबुराव व्यवहारे, डॉ. गौतमचंद रुणवाल आदींची उपस्थिती होती. उपस्थितांचे स्वागत आणि आभार प्रदर्शन संघटनेचे सचिव अशोक हुरगट यांनी केले.

जिल्हा परिषद,बीड

### ग्रामपंचायत कार्यालय चिंचवण,ता.वडवणी,जिल्हा बीड

ग्रामपंचायत कार्यालय चिंचवण,ता.वडवणी,जि.बीड यांच्यावतीने खालील कामासाठी ग्रामपंचायतीला योग्य त्या एजन्सीकडून बी-१ नमुन्यातील ई-निविदा मागविण्यात येत आहेत. एजन्सी यांनी दिनांक २१/०२/२०२४ वेळ सकाळी ११.०० वाजेपासून ई-निविदा भराव्यात. सविस्तर माहिती ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर व ग्रामपंचायत कार्यालयात दिनांक २१/०२/२०२४ वेळ सकाळी ११.०० वाजेपासून ते दिनांक २७/०२/२०२४ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पाहता येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत | एजन्सी | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कचराकुंडी खरेदी | १५०००० | अनुभवी एजन्सी | ९० दिवस |
| २ | शौचाता कर्मचारी यांना आवश्यक साहित्य | ५०००० | अनुभवी एजन्सी | ९० दिवस |
| ३ | शाळा ई लर्निंग करणे | ६६३६८ | अनुभवी एजन्सी | ९० दिवस |
| ४ | हॅन्डवॉश स्टेशन/ वजन काटे खरेदी | ६४६४२ | अनुभवी एजन्सी | ९० दिवस |
| ५ | आंगणवाडीसाठी खेळणी किट इतर साहित्य खरेदी | १४१५७६ | अनुभवी एजन्सी | ९० दिवस |


सूचना -१) सर्व पात्र इच्छूक कंत्राटदार / एजन्सी नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. २) ई-निविदेतील बी-१ नमुन्यातील सर्व अटी कंत्राटदार / एजन्सीला बंधनकारक राहतील. ३) सदरील काम करताना कोणत्याही प्रकारचा अग्रीम दिला जाणार नाही. ४) सर्व साहित्य कामाचे स्थळावर कंत्राटदार एजन्सीने स्वत: उपलब्ध करून काम करणे आवश्यक आहे. ५) ई-निविदेतील अटी व शर्तीत बदल करण्यचाा व तसेच कोणतेही कारण न नेता निविदा स्विकारण्याचा अथवा रद्द करण्याचा सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, चिंचवण, ता. वडवणी,तजि.बीड यांनी राखून ठेवलेला आहे. ६) ई-निविदा उघडण्याची वेळ दिनांक २८/०२/२०२४स काळी ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय, चिंचवण, ता.वडवणी,जि.बीड.

ई-निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१) सदर संपुर्ण प्रक्रिया निविदाद्वारे होईल. सदर निवेदेसंदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी. सुचना, शुध्दीपत्रके इत्यादीची माहिती ग्रामपंचायत चिंचवण, ता.वडवणी,जि.बीड उपलब्ध राहतील. २) वरील कामाच्या निविदा विहित मुदतीत ग्रामपंचायतला सादर करता येतील. ३) अटी व शर्ती मान्यता प्रमाणपत्र व काळ्या यादीत नाव नसल्याचे प्रमाणपत्र ग्रामपंचायतला सादर करता येतील. ४) उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यास कोणतेही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. ५) सदर कामाच्या निविदाबाबत खालील बाबी आवश्यक राहतील. ६) तांत्रिक मान्यता क्रमांक -------- तांत्रिक मान्यता दिनांक, लिफाफा क्र. १ मध्ये कंत्राटदार / एजन्सी यांनी सादर करावा. लिफाफा क्र. १ मधील सर्व कागदपत्र ग्रा.पं. चिंचवण, ता. वडवणी,जि.बीड येथे दिनांक २७/०२/२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सादर करावे. ७) कामाच्या अंदाजत्रकीय किमतीनुसार शासन नियमाप्रमाणे कंत्राटदार अंदाजपत्रकीय किमतीनुसार शासन नियमाप्रमाणे कंत्राटदार/ एजन्सीकडून अनुज्ञेय मुद्रांकावरती (Stamp Duty) करारनामा करून दिल्यानंतर कार्यरंभ आदेश देण्यात येईल. ८) साहित्याच्या अंदाजपत्रकीय किमतीनुसार शासन नियमाप्रमाणे कंत्राटदार / एजन्सीकडून अनुज्ञेय करारनामा करून दिल्यानंतर कार्यरंभ आदेश देण्यात येईल. ९) कंत्राटदार/ एजन्सीस कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी कामाच्या अंदाजपत्रकीय किमतीनुसार २.५% सुरक्षा ठेव ग्रामपंचायतच्या खात्यावर (FSD) जमा करणे आवश्यक आहे. १०) सदर कामाच्या रक्कमेतून शासन नियमानुसार सर्व कपाती केल्या जातील.

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय, चिंचवण
ता.वडवणी,जि.बीड

# निवडणूक आयोगाविरोधात न्यायालयात ठाकरेंची याचिका स्ट्राँग



**मुंबई । वृत्तसेवा**

राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या दोन्ही पक्षांमधील मोठ्या फुटीनंतर पक्ष नाव आणि चिन्ह यासंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत. त्यामुळे आता शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकांबाबत काय होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यातच आता शिवसेना पक्ष नाव आणि चिन्ह धनुष्यबाण उद्धव ठाकरे यांना परत मिळू शकते, असा दावा करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्यासमोर हे प्रकरण आहे. ते नोव्हेंबर २०२४ ला निवृत्त होणार आहेत. निवृत्तीआधी त्यांना त्यांच्यासमोरील प्रकरणे संपवायची असतात. त्यामुळे उद्धव ठाकरेंना पक्षचिन्ह आणि पक्षनाव पुन्हा मिळण्याची संधी आहे. ठाकरेंचे युक्तीवाद स्ट्राँग आहेत. त्यामुळे त्यांना ते मिळू शकते, असा दावा सर्वोच्च न्यायालयातील वकील सिद्धार्थ शिंदे यांनी केला आहे. निवडणूक आयोगाविरोधात उद्धव ठाकरेंची केस स्ट्राँग आहे. शिवसेना पक्षासंदर्भात आता फक्त युक्तीवाद राहिला आहे. मार्च महिन्यात युक्तीवाद होणार आहे. त्यानंतर एक-दोन तारखा दिल्या जातील. या तारखांना युक्तीवाद पूर्ण झाल्यानंतर निर्णय राखून ठेवला जाईल आणि त्यानंतर निकाल जाहीर केला जाईल, असे सिद्धार्थ शिंदे यांनी म्हटले आहे. एकंदरीत परिस्थिती पाहता उद्धव ठाकरेंना शिवसेना पक्षनाव आणि धनुष्यबाण पक्षचिन्ह परत मिळू शकेल. लोकसभा निवडणुकीआधी हा निकाल येईलच असे नाही. पण विधानसभा निवडणुकांपूर्वी यासंदर्भातील येण्याची शक्यता आहे, असे मत शिंदे यांनी मांडले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात उद्धव ठाकरे सर्वोच्च न्यायालयात आले. सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयावर स्थगिती दिली नाही. पुढील आदेश येईपर्यंत उद्धव ठाकरेंना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे पक्षनाव आणि मशाल पक्षचिन्ह वापरण्याचे निर्देश दिले. परंतु, आता त्याला एक वर्ष झाले आहे, असेही त्यांनी सांगितले.

## कोट्यावधींचे ड्रग्स जप्त

पुणे – पोलिसांनी मोठी कारवाई करत १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे ड्रग्स जप्त केले आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने केलेल्या या कारवाईत ५२ किलो पेक्षा आधिक मेफेड्रॉन मिळून आला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात एका किलो एमडीची किंमत २ कोटी रुपये आहे. पुण्यातील विश्रांतवाडी भागात गुन्हे शाखेने छापा टाकून ही कारवाई केली आहे. विशेष म्हणजे संशय येऊ नये म्हणून मिठाच्या पॅकमध्ये या पावडरची विक्री केली जात होती. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली असून, वैभव ऊर्फ पिंट्या भारत माने (रा. पुणे), अजय अमरनाथ करोसिया (वय ३५ वर्ष, रा. पुणे) आणि हैदर शेख (रा. विश्रांतवाडी) अशी अटक आरोपींची नावे आहेत. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी अमली पदार्थांवर थेट कारवाईचे आदेश पुणे पोलिसांना दिले आहेत. त्यानुसार पुणे पोलिस दलाच्या गुन्हे शाखेने शहरातील विश्रांतवाडी भागात छापा टाकला. यावेळी मोठ्या प्रमाणात मेफेड्रॉन (एमडी) मिळून आले. तब्बल साडेतीन कोटींचे एमडी असण्याची शक्यता आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मीठ विक्रीच्या आडून हे रॅकेट सुरू होते. तसेच आरोपींच्या मागावर गुन्हे शाखेची दहा पथके रवाना झाली आहेत.

## पोलीस ठाण्यातच पोलीस निरीक्षकाची स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या

नाशिक – नाशिकच्या अंबड पोलीस ठाण्यात पोलीस अधिकाऱ्याने स्वतःवर झाडली गोळी झाडल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पोलीस निरीक्षक अशोक नजन यांनी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली आहे. अंबड पोलीस ठाण्यात स्वतःच्या कॅबीनमध्ये आज सकाळी पोलीस निरीक्षक अशोक नजन यांनी आज मंगळवारी सकाळी स्वतःच्या पिस्तूलमधून डोक्यात गोळी मारून आत्महत्या केली. यामुळे नाशिक पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे. त्यांचे आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यांनी स्वतःवर गोळ्या झाडताच पोलिसांची मोठी धावपळ उडाली आहे. शहर परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी एक विवाहिता व तीन तरुणांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या नोंदी विविध पोलीस ठाण्यांत करण्यात आल्या आहेत. आत्महत्येचा पहिला प्रकार दारणा रोड येथे घडला. सुनीता सुनील ठाकरे (२७, रा. शेवगेदारणा रोड, चौधरी मळा, देवळाली कॅम्प) या विवाहितेने राहत्या घरी गळफास घेतला. ही बाब लक्षात आल्यावर तिचे पती सुनील बाबूलाल ठाकरे यांनी विवाहितेला औषधोपचारासाठी कॅन्टोन्मेंट रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी विवाहितेला तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## राज्यात गुंडगिरीमुळे जनतेत नाराजी

मुंबई – सत्ताधाऱ्यांकडे प्रचंड बहुमत असताना त्यांना राज्यातील जनतेच्या आशा-अपेक्षा पूर्ण करता आलेल्या नाहीत. सध्या राज्यात गुंडगिरी आणि पैशाचे राजकारण सुरू आहे. राज्यातील जनतेत सरकारबद्दल प्रचंड नाराजी आणि असंतोष आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार जयंत पाटील यांनी केले. बहे (ता. वाळवा) येथे विकासकामांचे उदघाटन व भूमिपूजनानिमित्त आयोजित समारंभात ते बोलत होते. 'राजारामबापू'चे माजी संचालक माणिकराव पाटील अध्यक्षस्थानी होते. राज्यातील जनतेत सरकारबद्दल प्रचंड नाराजी आणि असंतोष आहे. सध्या राज्याच्या राजकारणामध्ये जे काही चालले आहे, ते सर्व जनतेला कळत आहे. लोकांना हे पसंत नाही. याचे उत्तर जनता मतपेटीतूनच देईन. सरपंच संतोष दमामे यांनी स्वागत केले. याप्रसंगी बी.डी. पवार, बाळासाहेब पाटील, संदीप नरके, राहुल माने, संग्राम जाधव, देवराज देशमुख, संभाजी दमामे, अविनाश खरात, पोपट जगताप आदी उपस्थित होते. प्रकाश रसाळ, जयवंत काळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. शशिकांत पाटील यांनी आभार मानले.

# लातूर विभागातून ९६ हजार विद्यार्थी देणार बारावीची परीक्षा



**लातूर । वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे बारावीच्या लेखी परीक्षेला २१ फेब्रुवारी, बुधवारपासून सुरुवात होणार असून, लातूर विभागीय मंडळातील ९६ हजार १७९ विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाणार आहे. यासाठी २३८ केंद्रांची निवड करण्यात आली असून, बुधवारी पहिलाच पेपर इंग्रजीचा असल्याने शिक्षण मंडळाकडून कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येत आहे. लातूर विभागीय मंडळात नांदेड, धाराशिव आणि लातूर या तीन जिल्ह्यांचा समावेश असून, बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा यापुर्वीच पार पडल्या आहेत. बुधवारपासून लेखी परीक्षेला सुरुवात होणार असून, लातूर जिल्ह्यात ९५, धाराशिव ४२ आणि नांदेड जिल्ह्यातील १०१ केंद्रावर या परीक्षा होणार आहेत. २१ फेब्रुवारी ते १९ मार्च या कालावधती परीक्षा होणार असून, काही विषयांचे पेपर सकाळी ११ ते दुपारी २ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ६ अशा सत्रात होणार आहेत. लातूर विभागीय मंडळाकडून लातूरसाठी १७, नांदेड १९ आणि धाराशिवसाठी १० परिरक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी यापुर्वीच संपर्क क्रमांक देण्यात आलेले आहेत. दरम्यान, बारावीच्या परीक्षा बुधवारपासून सुरु होत असून, केंद्रप्रमुख, परिरक्षक आणि भरारी पथकाचे नियोजन करण्यात आले आहे. कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा होणार असून, लातूर विभागीय मंडळाने सर्व तयारी पुर्ण केली असल्याचे विभागीय मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग यांनी सांगितले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

**नागपूर । प्रतिनिधी**

अज्ञात वाहनाने धडक दिल्यामुळे ट्रॅव्हल्समध्ये कार्यरत कर्मचारी ठार झाल्याची घटना सक्करदरा पोलिस ठाण्यांतर्गत रविवारी १८ फेब्रुवारीला रात्री ८.४५ वाजताच्या सुमारास सक्करदरा उड्डाणपुलावर घडली. सचिन भाष्कर मिरे (३४, रा. गल्ली नं. २, आशिर्वादनगर) असे या अपघातातमृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सचिनच्या कुटुंबात पत्नी, आईवडिल आणि भाऊ आहे. ते पत्नीसोबत वेगळे राहत होते. ते साई ट्रॅव्हल्समध्ये कर्मचारी होते. रविवारी रात्री ते आपली दुचाकी क्रमांक एम. एच. ४९, एस-५१२ ने गणेशपेठ येथे जात होते. सक्करदरा उड्डाणपुलावर मध्यभागी अज्ञात वाहनचालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर आरोपी वाहनचालक पळून गेला. सचिन यांना उपचारासाठी मेडिकलमध्ये नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी सोनल सचिन मिरे (३३) यांनी दिलेल्या तक्रारीवरून सक्करदरा ठाण्याचे उपनिरीक्षक सागर अरबट यांनी अज्ञात आरोपी वाहनचालकाविरुद्ध कलम २७९, ३३८, ३०४ (अ), सहकलम १३४, १७७, १८४ नुसार गुन्हा दाखल करून आरोपी वाहनचालकाचा शोध सुरु केला आहे.

## गुन्ह्यातील आरोप सिद्ध न झाल्याने चौघांची मुक्तता

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसेवा**

आरोप सिद्ध न झाल्यामुळे पतीसह सासरच्या चौघांची हुंडाबळीच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करणारा सत्र न्यायालयाचा निकाल औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती अभय एस. वाघवसे यांनी कायम करीत सरकार पक्षाचे अपील फेटाळले. हुंड्याचे उर्वरित एक हजार रुपये आणि शेती खरेदी करण्यासाठी २० हजार रुपये विवाहितेने माहेरहून आणले नसल्यामुळे शारीरिक व मानसिक छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा सासरच्या लोकांवर आरोप होता. रेकॉर्डवरील पुरावा, साक्षीदारांचे जबाब आणि मृत्यूपूर्व जबाबाचे अवलोकन केले असता विवाहितेने रागाच्या भरात आत्महत्या केल्याचे निष्पन्न होते. आरोपींनी छळ केल्याबाबतचा पुरावा कमकुवत आणि तकलादू असल्याचे निरीक्षण नोंदवीत खंडपीठाने वरीलप्रमाणे आदेश दिला. बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यामधील बरगवाडी येथील मंदाबाई शिवाजी गुजर हिने १६ जानेवारी १९९८ रोजी अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेतले होते. पती शिवाजी, दीर अशोक, सासरा सर्जेराव आणि सासू कांताबाई हे हुंड्याचे उर्वरित एक हजार रुपये आणि शेती खरेदी करण्यासाठी २० हजार रुपयांची मागणी करीत छळ करीत होते, असा मंदाबाईचा मृत्यूपूर्व जबाब होता. उपचारादरम्यान १९ जानेवारी १९९८ ला मंदाबाईचा मृत्यू झाला. बीडच्या सत्र न्यायालयाने आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली होती. सत्र न्यायालयाच्या या निर्णयाला शासनाद्वारे खंडपीठात आव्हान देण्यात आले. आरोपींतर्फे ड. राजेंद्र हंगे यांनी काम पाहिले. एखाद्या आरोपीविरुद्ध एकाच गुन्ह्यासाठी दोनदा खटला चालवून त्याला एकापेक्षा जादा वेळा शिक्षा ठोठावणे (डबल जिओपार्डी) कायद्याला अपेक्षित नाही. मात्र, प्रस्तुत प्रकरणातील पती शिवाजीविरुद्ध १९९५ साली भादंवि कलम ४९८-अ नुसार खटला दाखल झाला होता. पती-पत्नीमध्ये तडजोड होऊन पत्नी पुन्हा नांदावयास आली होती, याकडे ड. हंगे यांनी खंडपीठाचे लक्ष वेधले.

## राज्यात सरकारकडून नियोजित दंगली

**नगर । प्रतिनिधी**

काँग्रेस-राष्ट्रवादीतून गेलेल्यांना भाजपात न्याय मिळतोय मात्र, भाजपातील निष्ठावंतावर सतरंज्याच उचलण्याची वेळ आली आहे. घरचे उपाशी आणि बाहेरचे तुपाशी अशी सध्या भाजपातील परिस्थिती आहे. ओबीसी नेत्या पंकजा मुंडे यांना आताही राज्यसभेची उमेदवारी नाकारली गेली. त्यामुळे मुंडे यांनी आता भाजपात जास्त अन्याय सहन न करता शिवसेनेत यावे, असे आवाहन शिवसेनेच्या (उबाठा) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केले. शिवसेनेच्या मुक्त संवाद यात्रेनिमित्त नगर शहरात आलेल्या अंधारे यांनी शनिवारी (दि.१७) येथे पत्रकार



परिषद घेत सरकारवर टीका केली. त्या म्हणाल्या. भाजपाला ओबीसीची काळजी असती तर त्यांनी ओबीसी नेत्या पंकजा मुंडे यांना राज्यसभेची उमेदवारी दिली असती. मराठा आरक्षणाचा प्रश्न भाजपा सोडवू शकते मात्र, त्यांना हा प्रश्न सोडवायचा नाही. हे सरकार आरक्षणाच्या मुद्यावरून मराठा-ओबीसीमध्ये वाद लावत आहे. राज्यात सरकार प्रायोजित दंगली घडत आहेत. गेल्या काही दिवसांपासून नारायण राणे व नितेश राणे यांचे वक्तव्य जनक्षोभ निर्माण करणारे ठरत आहेत. भाजपाने यांना वेळीच आवर घातली नाही तर राज्यातील परिस्थिती बिघडू शकते. दुसरीकडे राज्यातील शेतकऱ्यांची परिस्थती मोठे विदारक आहे. याकडे सरकारचे लक्ष्य नाही. असे अंधारे म्हणाल्या. यावेळी सेनेचे जिल्हा प्रमुख शशिकांत गाडे, उपजिल्हा प्रमुख गिरिश जाधव, शहर प्रमुख संभाजी कदम, माजी महापौर भगवान फुलसौंदर आदी उपस्थित होते.

# सरकारच्या अपयशी धोरणांमुळे राज्यातील निवासी डॉक्टरांचा संप

**मुंबई । वृत्तसेवा**

सरकारने बैठीत दिलेले आश्वासन पूर्ण केले नसल्याने सेंट्रल मार्ड या निवासी डॉक्टरांच्या संघटनेकडून पुन्हा एकदा संपाची हाक देण्यात आली आहे. त्यामुळे २२ फेब्रुवारीपासून सायंकाळी ५ वाजल्यापासून विविध मागण्यांसाठी राज्यभर जाणार डॉक्टर संपावर जाणार आहेत. यापूर्वी ७ फेब्रुवारीला संपाची हाक दिली होती, त्यावेळी उपमुख्यमंत्री यांनी डॉक्टरांसोबत बैठक घेत त्यांचा मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, दोन आठवडे उलटले तरी मागण्याबाबत सरकार विचार करत नसल्याने डॉक्टरांनी संप करण्याचा निर्णय घेतलाय. २२ तारखेपासून अत्यावशक सेवा वगळता इतर सेवा बंद राहणार. त्यामुळे रुग्णांचे हाल होऊ शकतात.



वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या आणि एमबीबीएसची पदवी पूर्ण केलेल्या डॉक्टरांना पदव्युत्तर शिक्षण घेण्याची इच्छा असते. शिवाय पदव्युत्तर शिक्षणही आवडत्या विषयात घेण्याचा डॉक्टरांचा कल असतो. राज्यात दरवर्षी ४ हजारांच्या आसपास डॉक्टर पदव्युत्तर शिक्षण घेतात. मात्र, शिक्षण घेताना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. विद्यावेतन, वसतिगृहातील व्यवस्था, सुरक्षा याबाबत डॉक्टरांनी सरकारकडे काही मागण्या केल्या आहेत. डॉक्टरांच्या समस्या अनेकदा प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत. मात्र, सरकारकडून त्यांच्या समस्यांवर कोणताच तोगडा काढण्यात आलेला नाही.

निवासी डॉक्टरांच्या संघटनेने म्हणजेच मार्डने अखेर संपाच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मार्डने संप आणि आंदोलनाच्या माध्यमातून आपल्या काही मागण्या पूर्ण देखील करुन घेतल्या आहेत. शिवाय, काही समस्यांबाबत सरकारकडून आश्वासन देण्यात आले होते. मात्र, सरकारकडून ही आश्वासने पूर्ण करण्यात आली नाहीत. पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी वारेमाप फी आकारण्यात येते. त्यानंतर महाविद्यालयांमध्ये त्यांना प्रवेश मिळतो. मात्र, मात्र अनेक वेळा चांगले शिक्षण देणारे प्राध्यपक विद्यार्थ्यांना मिळत नाही, अशा तक्रारी करण्यात आल्या आहेत. शिवाय, प्राध्यापकांकडून विद्यार्थ्यांना धाकात ठेवण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकारही समोर आला होता. त्यामुळे प्राध्यापकांना पदावरुन हटवण्याच्या मागण्या देखील करण्यात आल्या होत्या. त्यामुळे या निवासी डॉक्टरांच्या संघटनेकडून पुन्हा एकदा संपाची हाक देण्यात आली आहे. त्यामुळे २२ फेब्रुवारीपासून सायंकाळी ५ वाजल्यापासून विविध मागण्यांसाठी राज्यभर जाणार डॉक्टर संपावर जाणार आहेत.

## नगर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विकास कामे मार्गी

**नगर । वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार अंगीकारून समाजाप्रती असलेले कर्तव्य पार पाडत आहे. महाराजांना अभिप्रेत असे काम विकासाच्या माध्यमातून शहरात उभे करू, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण कामाचा प्रारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून मिरवणूक मार्गावरील पहिल्या टप्प्याचे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते श्री विशाल गणपती मंदिरापर्यंत रस्ता काँक्रिटीकरणाचे काम मार्गी लागणार आहे. श्री विशाल गणपती मंदिरात भाविक मोठ्या संख्येने येत असून, त्यांना चांगल्या दर्जाच्या सुविधा देण्याचे काम केले आहे. माळीवाडा बसस्थानक हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असून, या ठिकाणी प्रवासी, विद्यार्थी मोठ्या संख्येने येत असतात. तसेच, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यालय देखील या ठिकाणी असल्यामुळे हा रस्ता रहदारीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.



वडवणी – कुळवाडी भुषण शिव छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना जेष्ठ नेते प्रा.सोमनाथराव बडे, युवा नेते जमाले , अनिल वाघमारे,दत्तात्रय माने ,दिपकराव उजगरे आदी छायाचित्रात दिसत आहेत.



ग्रामपंचायत कार्यालय चिंचवन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या वेळी बडे यांच्या सह उपस्थित सर्व मान्यवर सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सर्व सदस्य सर्व्व गावकरी मंडळी छायाचित्रात दिसत आहेत.



गंगनाथवाडी : ग्रामपंचायत कार्यालय येथे छत्रपति शिवाजी महाराजांची जयंती साजरी करताना सरपंच गणपत डोईफोडे, सह ग्रामपंचायत सदस्य छायाचित्रात दिसत आहेत.

# शिवजयंती आष्टीत शाळा, महाविद्यालयात साजरी



**आष्टी । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती १९ फेब्रुवारी रोजी सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. आष्टी तालुक्यातील सर्व शाळा, महाविद्यालयांमध्ये मोठ्या उत्साहाने शिवजयंती साजरी करण्यात आली. आष्टी शहरातील शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये सकाळी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमापूजनानंतर आयोजित विविध शाळेच्या विद्यार्थ्यांकडून छत्रपती शिवराय यांच्या प्रेरणादायी जीवन चरित्रावर आयोजित वक्तृत्व, नृत्य सादरीकरण करण्यात आले. यावेळी वसुंधरा प्राथमिक विद्यालय, आष्टी येथील स्वराज बाळासाहेब तळेकर या इयत्ता पहिली तील बालचिमुकल्याने सादर केलेल्या तडाखेबंद भाषणाने उपस्थितांची मने जिंकली.स्वराजचे वडील बाळासाहेब तळेकर सर देखील उत्कृष्ट निवेदक आहेत.आष्टी तालुक्यातील विविध मोठया मोठया कार्यक्रमात तर बहारदार सूत्रसंचालन करतात. त्यांच्या वारसा स्वराज चालविल असे प्रेक्षकांत बोलले जात होते. छत्रपती शिवरायांच्या जन्मापासून ते बाल शिवबांच्या अनेक प्रसंगांनी, शिवरायांच्या नेतृत्वगुणांचे आणि आदर्श रयतेचे राज्य निर्मितीचे प्रसंगांनी स्वराजने उपस्थितांच्या अंगावर शहारे उभे केले. स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा हा प्रसंग सांगत असताना उपस्थितांनी शिवरायांचा जयघोष आणि टाळ्यांनी मोठ्या प्रमाणात या चिमुकल्याला दाद दिली. अतिशय लहान वयातील इयत्ता पहिलीच्या स्वराज या विद्यार्थ्याने केलेले अप्रतिम भाषण, भारदस्त आवाज, शब्दफेक, सभाधिटपणा, हावभाव आणि सादरीकरणाने उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. या अगोदरही स्वराजने अनेक शालेय स्पर्धांमध्ये व विविध कार्यक्रमांमध्ये आपल्या वक्तृत्वाने चणूक दाखवलेली आहे. उपस्थित सर्व मान्यवर, पाहुणे, शिक्षक, पालक, विद्यार्थी, पत्रकार बांधव व आयोजकांनी त्याच्या या सादरीकरणाबद्दल कौतुक केले. यावेळी प्रशस्तीपत्र व गुलाब पुष्प देऊन आयोजकांनी त्याचे कौतुक केले व भविष्यातील एक उत्तम प्रभावी वक्ता बनशील अशा शुभेच्छा दिल्या.

# गांजा घेऊन जाणारी स्कॉर्पिओ पकडली

**बीड । प्रतिनिधी**

मांजरसुंबा घाटातून जाणार्या स्कॉर्पिओमध्ये गांजा असल्याची माहिती नेकनूर पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी या गाडीची झाडाझडती घेतली असता त्यात नऊ किलो गांजा आढळून आला. गांज्याची किंमत १ लाख १४ हजार रुपये इतकी आहे. पोलिसांनी गांज्यासह गाडी जप्त केली. बीड ते मांजरसुंबा मार्गे जामखेडला निघालेली स्कॉर्पिओ क्र. एम.एच. १२ आर.एन. ६५७२ या गाडीत गांजा असल्याची माहिती पोलिसांना झाल्यानंतर पोलिसांनी मध्यरात्री दोन वाजण्याच्या दरम्यान गाडीची झाडाझडती घेतली असता त्यात नऊ किलो गांजा आढळून आला. या गांज्याची किंमत १ लाख १४ हजार रुपये आहे. गांजासह स्कॉर्पिओ पोलिसांनी जप्त केली. एकूण मुद्देमालाची किंमत ८ लाख १४ हजार रुपये इतकी आहे. या प्रकरणी ज्ञानेश्वर बबन काळकुटे (रा. अंतरवली टोबी घनसांगवी जि. जालना), प्रदीप जगदाळे (रा. आष्टी) व दादा चव्हाण (रा. जामखेड) तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोस्वामी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक घुले, सचीन मुरुमकर, मुकुंद ढाकणे, होमगार्ड जाधव, होमगार्ड सय्यद इम्रान यांनी केली आहे. पुढील तपास चंद्रकांत गोस्वामी हे करत आहेत.

## श्रुतिकाला शिक्षणासाठी मदत

**परळी । प्रतिनिधी**

परळी विधानसभा मतदारसंघातील तळेगाव घाट ता.अंबाजोगाई जिल्हा बीड येथील श्रुतिका यादव ही विद्यार्थिनी सध्या लातूर येथे नीट या परीक्षेची तयारी करत आहे.श्रुतिका यादव या मुलीचे आई वडील मोल मजुरी करून मुलीचे डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहेत.परंतु आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे मुलीच्या शिक्षणामध्ये अडचण येत आहे व श्रुतिका यादव हे तिचे स्वप्न पूर्ण करण्यास असमर्थ ठरत आहे ही बाब जाधव यांना समजल्यानंतर ड माधव जाधव यांनी श्रुतिका यादव हिच्या पुढील शिक्षणासाठी दहा हजार रुपये (१००००/-) रोख आर्थिक मदत करून तिला आधार दिला. तसेच या पुढील शिक्षणासाठी लागेल ती मदत करण्याची हमी जाधव यांनी दिली.



## छत्रपती शिवरायांची जयंती साजरी

बीड – बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथे प्रतिवर्षा प्रमाणे या वर्षी महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सर्जेराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी हानुमान देवकते माजी उपसरपंच, नागेश शिंदे माजी सरपंच, कैलास देवकते, भगवान देवकते.नारायण देवकते ग्रामपंचायत सदस्य, परमेश्वर थापडे उपसरपंच, शरद देवकते ग्रामपंचायत सदस्य, रामकिशन थापडे, भागवत खाकरे, गोविंद जाधव, आगद तुकडे, बळीराम जाधव मुख्यध्यापक, थापडे पांडुरंग, दिनेश पिसाळ, दिलीप देवकते, आदी उपस्थित होते.

## शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

बीड - अखिल भारतीय विद्यार्थी परिषद,बीड आयोजित गतवर्षी प्रमाणे १९ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या शिवजन्मोत्सवास प्रमुख उपस्थिती म्हणून अभाविप देवगिरी प्रदेशमंत्री कु.वैभवी ढीवरे या उपस्थित होत्या. भारतीय संस्कृतीप्रमाणे पारंपरिक पद्धतीने विद्यार्थिनींच्या हस्ते पाळणा झुलवत शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी शहरातील विविध महाविद्यालयातून विद्यार्थी – विद्यार्थिनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमासाठी सहभागी झाले होते. यावेळी शहर सहमंत्री राघवेंद्र कुलकर्णी,गणेश जोशी,शहराध्यक्ष प्रा.डॉ.जगन्नाथ चव्हाण,जिल्हा प्रमुख प्रा.डॉ.अरुण पाटील, प्रदेशाध्यक्ष प्रा.डॉ.सचिन कंदले, राष्ट्रीय कार्यकारणी विशेष निमंत्रित सदस्य प्रा.डॉ.सारंग जोशी व शहरातील सर्वे कार्यकर्ते उपस्थित होते.

## तहसील कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

बीड – छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी तहसील कार्यालयातील तहसीलदार सुहास हजारे,नायब तहसीलदार श्रीमती कमल कुटे, पेशकार विकास कोरडे, महसुल सहय्यक सुधाकर नागरगोजे, अव्वल कारकुन क्रांती इंगळे, महसुल सहाय्यक रुपाली मस्के, महसुल सहाय्यक दिनेश कोरडे यांच्यासह उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी जय भवानी सांस्कृतीक कलापथकातील किशोर धुताडमल,राजू धुताडमल यांच्यासह अन्य लोककलावंतांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर विविध गीते व पोवाडे सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक तहसीलदार श्री. हजारे यांनी तर आभार प्रदर्शन श्री. नागरगोजे यांनी मानले.

## शिवाजी महाराज जयंतीनिमित्त स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

गेवराई – तालुक्यातील तलवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील प्रत्येक घटना विद्यार्थ्यांना आत्मसात व्हावी. तलवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या आणुषंगाने जयंती उत्सव समीतिने सामाजिक उपक्रम राबवित आसतांना शालैय विध्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनात भर पडावी हा उद्देश्य समोर ठेऊन काही स्पर्धा आयोजित केल्या होत्या त्या मध्ये शिवचरित्र ज्ञान स्पर्धेत तलवाडा येथील राघव लक्ष्मण राऊत हा विध्यार्थी प्रथम आला असुन छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने विविध मान्यवरांच्या उपस्थिति मध्ये राघव राऊत या विध्यार्थ्याचा यथोचित सम्मान करण्यात आला.

## राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची जयंती शाळा व कार्यालयात साजरी व्हावी

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची शुक्रवार दि. २३ फेब्रुवारी २०२४ रोजी १४८ वी जयंती जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालय व शासकीय, निमशासकीय कार्यालयात साजरी करण्यात यावी असे आवाहन शिवसेना उपजिल्हाप्रमुख युवा नेते अजय जाधव यांचे आवाहन यांनी केले. राष्ट्रसंत गाडगे बाबा यांनी दीडशे वर्षापूर्वी स्वच्छतेचे महत्व पटवून देवून ते आचरणात आणले होते. आज त्यांच्या विचारांची नितांत गरज आहे. घर स्वच्छ तर परिसर स्वच्छ, गाव स्वच्छ तर देश स्वच्छ हे ब्रिद राष्ट्रसंत गाडगे बाबा यांनी समाजाला पटवून दिले. गाडगे महाराज हे गोरगरीब, दीनदलित यांच्यामधील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी कार्य करणारे समाजसुधारक होते. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे पालन करावे, आपले घर व आपला परिसर तसेच शाळा स्वच्छ ठेवावी इत्यादी बाबत मार्गदर्शन करतात. राष्ट्रसंत गाडगे बाबा यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजाची सेवा करण्यात व्यतित केले असून त्यांच्या विचारांची आज खरी गरज समाजाला पटू लागली आहे. त्यामुळे अशा आदर्श राष्ट्रसंतांचे विचार घरघरात पोहचण्याची खरी गरज आहे.

# जरांगे पाटलांच्या आंदोलन समर्थनार्थ बालाघाटातून युवकांची पदयात्रा

**सिरसाळा । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटलांनी अंतरवेली सराटीत चालवलेल्या मराठा आरक्षण अंदोलनाच्या समर्थनार्थ धारुर तालुक्यातील कान्नापूर येथील युवकांनी अर्धनग्न पदयात्रा अंदोलन गेल्या दोन दिवसांपासून आयोजित केली असुन आज हि पदयात्रा अंदोलन बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण बाबत सरकारने काढलेल्या अधिसूचनेत सगे सोयरे मराठा आरक्षण अंमलबजावणी करावी या मागणी च्या संदर्भात आगळे वेगळे अंदोलन करुन कान्नापूर च्या युवकांनी लक्ष वेधले आहे . दिनांक १८,१९ व २० फेब्रुवारी असा ह्या पदयात्रा अंदोलनाचा तीन दिवसीय कार्यक्रम आहे. कान्नापूर ते सिरसाळा – दिंद्रूड – तेलगाव – वडवणी – घाटसावळी – ढेकणमोहा ,राजुरी ते थेट बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आज दुपारी १२ वाजेपर्यंत हि अर्धनग्न पदयात्रा अंदोलन धडकणार आहे. अर्धनग्न पदयात्रा असल्याने ह्या अंदोलनाने शासन /प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.शेकडो युवक पदयात्रेत सहभागी झाले असुन आज बीड जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवेदन देण्यासाठी अनेक गावातील मराठा समाज बांधव उपस्थित राहणार आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात झाले. या प्रसंगी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी कु. आरती नखाते, कु. साक्षी वानखेडे, कु.प्रगती गायकवाड, आदित्य आडागळे आणि ओमकार गिते या विद्यार्थ्यांनी तसेच यु.बी.पवळ, संतोष मेश्राम आणि विजय देशमुख यांनी आपले विचार प्रतिपादन केले. या प्रसंगी मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज, आदर्श राज्यकर्ता या विषयी विद्यार्थ्यांनी व्यापक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख, प्रास्ताविक श्रीम.एन.जी.मुंडे आणि आभार डब्ल्यु.एस.वाघमारे यांनी केले. बहुसंख्य विद्यार्थी, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी डी.जी.हजारे, भारत कोळेकर उपस्थित होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.



बीड – महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती काल देशभरात उत्साहात साजरी झाली. बीडमध्ये शिवजन्मोत्सवा निमित्त शिवप्रेमींनी काढलेल्या मिरवणूकीत शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी शिवरायांचा जयघोष केला.

## धडकेत दुचाकीस्वार गंभीर

**केज । प्रतिनिधी**

दुचाकीची धडक होऊन झालेल्या अपघातात दुचाकीस्वार टिप्परच्या मागील चाकाखाली आल्याने दुचाकीस्वाराचे दोन्ही ही पाय फॅक्चर झाले असून गंभीर जखमी झाल्याची घटना केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रविवारी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास घडली. जखमी दुचाकीस्वारास उपजिल्हा रुग्णालयात प्रथमोपचार करून अंबाजोगाईच्या स्वाराति ग्रामीण रूग्णालयात पाठविण्यात आले आहे. केज तालुक्यातील साबला येथील शेतकरी ज्ञानेश्वर लक्ष्मण मुळे ( वय ४० ) हे माळेगाव येथील बहीणीला भेटुन केजमार्गे साबल्याकडे आपल्या दुचाकीवरून ( एम. एच. ४४ – एक्स ५१०८ ) जात असताना केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बसस्थानकाकडून आलेल्या टिप्पर ( एम. एच. ४४ – ९९१६ ) व त्यांच्या दुचाकीचा अपघात झाला.

# केज तालुक्यात बारावी परीक्षेसाठी यंत्रणा सज्ज

**केज । प्रतिनिधी**

उद्यापासून बारावीच्या परीक्षेला सुरुवात होत आहे. बारावीच्या परीक्षेच्या संदर्भात शिक्षण मंडळाकडून पूर्ण तयारी झाली असून कॉपीमुक्त वातावरणामध्ये परीक्षा पार पाडण्यासाठी शिक्षण मंडळ सज्ज झाले आहे.त्या अनुषंगाने वेगवेगळ्या उपाययोजनाही करण्यात आलेल्या आहेत.एचएससी बोर्डाची परीक्षा उद्यापासून सुरुवात होत आहे. इंग्रजीच्या पेपरने परीक्षेची सुरुवात होत आहे. राज्यामध्ये लाखो विद्यार्थी परीक्षा देणार आहेत आणि त्याच अनुषंगाने केज तालुक्यातही एकूण दहा परीक्षा केंद्रांवर बारावीची परीक्षा पार पडणार आहे. तालुक्यातील ३९०० विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट होणार आहेत. यामध्ये मागच्या वर्षी पेक्षा एका केंद्राची भर पडली असून आता शहरातील वि.दा. कराड महाविद्यालयातही बारावीची परीक्षा होणार आहे. परीक्षा पार पाडण्यासाठी केज गट साधन केंद्राचे गटशिक्षणाधिकारी श्री. बेडसकर यांनी संपूर्ण तयारी केली असून प्रत्येक केंद्रावर एक बैठे पथक नेमण्यात आलेले आहे. बैठे पथकामध्ये तीन सदस्यांचा समावेश असणार आहे तर गटशिक्षण अधिकारी कार्यालयाचेही एक भरारी पथक नेमण्यात आले आहे. त्याचबरोबर गट साधन केंद्रातून प्रश्नपत्रिका घेऊन जाण्यासाठी व उत्तरपत्रिका गट साधन केंद्रामध्ये पोहोच करण्यासाठी रनरचीही नेमणूक करण्यात आल्याची माहिती श्री. बेडसकर यांनी दिली. केज दि.२० – उद्यापासून बारावीच्या परीक्षेला सुरुवात होत आहे. बारावीच्या परीक्षेच्या संदर्भात शिक्षण मंडळाकडून पूर्ण तयारी झाली असून कॉपीमुक्त वातावरणामध्ये परीक्षा पार पाडण्यासाठी शिक्षण मंडळ सज्ज झाले आहे.त्या अनुषंगाने वेगवेगळ्या उपाययोजनाही करण्यात आलेल्या आहेत. दरम्यान बारावीच्या विद्यार्थ्यांनी कसल्याही प्रकारचा ताणतणाव न घेता अगदी प्रसन्न मनाने परीक्षा द्यावी असे आवाहनही श्री. बेडसकर यांनी केले आहे.

## बापलेकास रॉडने मारहाण

**केज । प्रतिनिधी**

मुलीसोबत रजिस्टर मॅरेज केल्याचा राग मनात धरून मुलीच्या नातेवाईकांनी मुलास व त्याच्या वडीलास लोखंडी रॉडने मारहाण केल्याची घटना गदळेवाडी ( ता. केज ) येथे घडली. याप्रकरणी नऊ जणांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. गदळेवाडी ( ता. केज ) येथील अजय बंकट नाईकवाडे ( वय २९ ) या तरुणाने गावातील पायल नावाच्या मुलीसोबत तिच्या नातेवाईकांचा विरोध असताना मागील एक महिन्यापुर्वी आळंदी येथे रजिस्टर मॅरेज केले होते. लग्न केल्यानंतर पाच ते सहा दिवसांनी ते दोघे गावात आले होते. हातात काठ्या, कुऱ्हाडी घेऊन त्यांच्या अंगावर धावून आले. त्यांनी आमच्या मनाच्या विरोधात मुलीला फसवुन लग्न केले आहे. तुमचेकडे बघतोत असे म्हणत शिवीगाळ व लाथाबुक्याने मारहाण केली. पदमाकर जाधव याने रॉडने अजय नाईकवाडे याच्या डोक्यात मारून गंभीर दुखापत केली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com